# शेतक-यांनो ! आस्तित्वासाठी लढा सुरु करा

-दिलीपराव देशमुख बारडकर
उपाध्यक्ष,

## इंग्रज राजवटीतील अनुभव :-

इंग्रज राजवटीत 'अटली ' ने राणी एलिझाबेथ यांना पत्र पाठवून नमूद केले होते की भारताला स्वातंत्र्य दिल्यास देश गुंड व भ्रष्टाचारी लोकांच्या हाती जाणार आहे. आज ते अक्षरश: खरे ठरले आहे. इंग्रज राजवटीत शिस्त होती, कायद्याचा वचक होता. भ्रष्टाचार तीव्र नव्हता. आज भ्रष्टाचार शिष्टाचार झाला आहे. सन १८७४ साली सुपा गावातील लोकांनी जमिनी गहाण ठेवून अन्याय करणा-या सावकाराला वाळीत टाकून पाहिले, नंतर त्याच्या घरावर शेण, घाण, मेलेले जनावर फेकली परंतु त्याचाही उपयोग झाला नाही तेंव्हा ७-८ गावचे लोकांनी कुणाचेही नेतृत्व नसतांना स्वयंस्फुर्तीने सावकाराच्या घरावर चालून गेले, विश्वंस केला व त्याला मारुन टाकले. इंग्रजांनी ताबडतोब सर्वांना अटक केली परंतु त्याकाळाचे इंग्रजाचे कृषि विभागाचे वरिष्ठ अधिकारी 'ह्यूम' यांनी शासनास शेतक-यांवर कोणतीही कारवाई करु नका असा आदेश दिला. त्या आदेशाने खवळून इंग्रज राजवटीने ह्यूमना बडतर्फे केले. चाकरी मुक्त झाल्यावर ह्यूमने भारतीय शेतक-यांना अन्यायाविरुध्द बंड करण्याचे आवाहन करणारी पत्रके देशभर वाटली. त्याकाळी परकियात चांगले अधिकारी होते. परंतु आज स्वकीय परकियांपेक्षा स्वार्थी किंबहुना देशद्रोही बनले आहेत.

## आजची देशातील परिस्थिती :-

आपल्या देशात कृषिप्रधान फक्त भाषणात म्हटले जाते पण या देशातील कृषि व कृषकाची (भरकटलेली) दुर्दशा आज सर्व नेत्यांनी केली आहे. सत्तेवर सगळी शेतक-यांचीच मुले आहेत पण आज ते भूमातेला बेईमान होवून स्वत:ची राजकीय पोळी भाजून घेण्यात मशगुल आहेत. आत्महत्या झालेल्या कुटूंबियांना पत्रकाराचा ताफा सोबत घेवून भेटणा-या पुढा-यात चढाओढ लागली आहे. त्याचेही राजकारण केले जात आहे. सत्तारुढ पक्षावर ताशेरे ओढणारे विरोधक स्वत: सत्तेवर असतांना निष्क्रीय होते हे सोई स्करसित्या विसरतात. प्रचंड पैसा खर्चून सत्तेचे पद मिळाल्यावर सर्वजण पैसा कमावण्याच्या मागे लागतात व भाषणात देशहिताच्या, जनकल्याणाच्या गप्पा मारतात. आज देशात एकतरी नेत्याचे आदर्श म्हणून नाव घेता येईल का ?. आजच्या ५४ % युवकांनी कुणाचा आदर्श घ्यावा हा खरा प्रश्न आहे. राष्ट्रपती अब्दुल कलाम व डॉ. मनमोहनसिंग आदर्श मानता येतील परंतु ते इतरांमुळे निष्प्रभ व हतबल आहेत. आज देश केवळ सर्वोच्या न्यायालय व जागरुक पत्रकारिता या दोन स्तंभावरच कसाबसा टिकून आहे. हे दोन्ही नसते तर आपल्या पुढा-यांनी देश केंव्हाच विकून परदेशात स्थायीक होण्यात धन्यता मानली असती.



1038/11, Balaji Niwas, Flat No. 5, Cosmos Bank Lane, Deep Bunglow Chowk, Model Colony, Pune - 411 016 Tel. : 25659090 / 32907302
email : moffpune@gmail.com Website : www.moffindia.com

भाबडे, असंघटीत शेतकरी प्रत्येकवेळी नेत्याच्या भूलथापांना बळी पडतो व मतदान करतो. मतदानानंतर सर्वजण त्याला वा-यावर सोडतात. निवडणुका झाल्या की सर्वजण निवडणूक जाहीरनाम्यात भरघोस घोषणा लिहितात. आज शेतक-यांना काय करावे हे समजेनासे झाले आहे. अगोदर श्री. शरद जोशींवर विश्वास ठेवला. आज ते गप्प आहेत. श्री. शरद पवारांकडे मोठ्या आशेने पाहिले परंतु त्यांनाही कांदे खावे लागत आहेत. उद्या लोक काय हातात घेतील सांगता येत नाही. एवढी स्फोटक परिस्थिती नेत्यांनीच निर्माण केली आहे. ऊस कारखानदारी, कंत्राटी शेती, द्राक्ष शेती उद्योग, हायटेक, वाईन (दारु) संस्कृती वाढवण्यातच देशाची प्रगती त्यांना दिसत आहे. दारु, किराणा दुकानात विक्रीसाठी ठेवून भारतीय नवयुवकांना कोणत्या मार्गाने नेते नेत आहेत समजत नाही. मूठभर लोकांच्या व उद्योगपतीच्या हितासाठी ६८ % गरीब शेतक-यांच्या बळी दिला जात आहे. भाकरी, पाणी पेक्षा दारुच महत्वाची वाटत चालली आहे. महात्मा गांधीचे खेडे स्वयंपूर्ण व समृध्द करण्याचे स्वप्न पुरे करण्याची शेतक-यांच्या आजच्या मसिहाला गरज वाटत नाही.

गेल्या दशकात बजाज स्कूटर २७,००० /- रुपयाला विकत होती त्यावेळी त्याचा उत्पादन खर्च रु. १२,००० /- होता. उद्योगपतींचा त्यांच्या उत्पादनावरील खर्च व नफा याची माहिती जाहीर करण्याची मागणी संसदेत झाली होती परंतु आजवर दबावामुळे ती कुणीच उघड केली नाही. आज उद्योगपती त्यांच्या उत्पादनावर १४०० ते २००० पट नफा मिळवतात परंतु शेतक-यांना त्यांच्या कापूस, ज्वारी, करडई, सूर्यफूल, बाजरी पिकवल्यानंतर अनुक्रमे रु. ७७,७५,६१,१४,७६ परत मिळतात. म्हणजे झालेला खर्चही परत मिळत नाही. त्यामुळे वरचेवर कर्ज घेवून त्याला शेवटी नाईलाजाने आत्महत्या करावी लागत आहे. याउलट उद्योगपती धंद्याचे दिवाळे निघाले म्हणुन जाहीर करुन आपले सर्व कर्ज देणे बुडवतो परंतु स्वाभीमानी शेतकरी प्राण जवळ करतो. हे चित्र नेत्यांना दिसत नाही का ?

**शहरी भारतीयांची उदासीनता :-**

स्वातंत्र्य मिळाल्यापासून कुणाचीही सत्ता येवो, शेती व शेतकरी या प्रमुख बाबींकडे सगळ्यांनी दुर्लक्ष केले आहे. मेंढरासारखी शेतक-यांची अवस्था करुन सोडली आहे. माझ्या मते हा लढा शहरी व ग्रामीण भारतीयांचा आहे. आज शहरातील नागरीक वीज, नोकरी, पाणी, क्रिडा, साहित्य, शिक्षण, करमणुक, व्यवसाय, अन्याय, हक्क सर्व बाबतीत जागरुक आहे. सर्वांना सुखाचे साधन सुविधा, पोटभर अन्न मिळते. परंतु त्यांचेंच देशबांधव खेड्यात कसे आयुष्य जगत आहेत. हे त्यांना दिसत नाही का, सरकारचे तोंड दाबून आपल्या बंधूवरील अन्याय दूर करण्यासाठी काही करण्याची त्यांना गरज वाटत नाही का ?. केवळ ग्रामीण आयुष्यावर कविता, कथा, कांदबरी लिहिण्यापर्यंतच त्यांचा रस आहे. श्री. प्रमोद महाजनवरील हल्ला, श्री. राहूल महाजनाची कोकेन सवय, श्री. नारायण राणेंचे पक्षांतर इत्यादीवर आपली लेखणी झिजवतांना वर्तमानपत्रात रोजच शेतक-यांच्या ४.५ आत्महत्यांना मात्र कोप-यात जागा मिळते. सर्वजण क्षणभर हळहळतात. नंतर विसरतात. शहरवासियांची ही नैतीक जिम्मेदारी आहे असे वाटते.

**परिस्थिती बदलत आहे :-**

१. कोणत्याही गोष्टीला मर्यादा असतात. सहनशक्तींचा अंत झाला की क्रांती घडते त्याची चिन्हेही हळहळू दिसत आहेत. पुण्याजवळ माण गावातील भूखंड घशात घालणा-या विरुध्द बंदोबस्तासाठी आलेल्या शेकडो पोलीस आले तेंव्हा सर्वात आधी मोजक्याच महिला घराबाहेर आल्या व त्यांनी गोफणीतून दगड पोलीसावर भिरकावले. त्यांचे पाहून पुरुषही बाहेर पडले व प्रतिकार वाढला. नेहमीप्रमाणे राजकीय स्वार्थासाठी नेतेही आले व नंतर शासनाला जमते घ्यावे लागले.

२. मिझोराममधील नदी खाजगी कंपनीने विकत घ्यायचा डाव जन आंदोलनाने हाणून पाडला.
३. आंध्रप्रदेशात मंत्र्याला लोकांनी लाथा बुक्या व चपलांनी बडवलेले दूरदर्शनावर अनेकांनी पाहिले.
४. नागपूरच्या महिलांनी भर कोर्टात जावून गुंडाला ठेचले . सगळ्यांना आठवत आहे.
५. अर्जेटिनातील लोकांनी १५ दिवस हायवे बंद करुन संपूर्ण देशाचा कारभार रोखला, १५ दिवसात ५ राष्ट्राध्यक्ष बदलावे लागले. आता सुरळीत कारभार आहे.

**लढा आजच सुरु करा :-**

आता आपली सहनशक्ती संपली आहे. आपला कुणीच वाली नाही. कुणाचाही आपल्याला आधार नाही हे लक्षात घ्या. आत्महत्या तर अजिबात करु नका. आपण सर्वांचे अन्नदाते असतानांही आपली अशी अवस्था सगळ्यांनी केली आहे. तेंव्हा आता बस झाले. गावात फक्त २०-२० जणांचे तरुण एकत्र व्हा व अन्याय, भ्रष्टाचाराविरुध्द लढा सुरु करा. नेत्यांना भर सभेत जाब विचारा. सत्तेवर आल्यानंतर कमावलेल्या इस्टेटीचा जाब विचारा. गावातील विधायक कामाचा पाठपुरावा करा. वीज, पाणी, महसूल, पोलीस व इतर खात्यातील भ्रष्ट अधिका-यांना संघटीतपणे दबाव आणून भ्रष्टाचार करु देवू नका, नेत्यांना गावबंदी करावी लागली तरी हरकत नाही. निवडणूकीतील आश्वासनपूर्तीचा जाब विचारा. प्रत्येक गावत लहान गट झाला की तो मोठा व्हायला वेळ लागत नाही फक्त सुरुवात करावी लाभेल. क्रांतीची एक ठिणगी पुरेशी आहे. या आंदोलनाचा गैरफायदा राजकीय पक्ष किंवा कुणाही नेत्याला घेवू देवू नका नाहीतर असे अनेक श्री. शरद जोशी वरचेवर तयार होतील व आपला गैरफायदा घेतील. गावोगावी "शेतकरी अन्याय निर्मूलन मंडळ" स्थापन करुन निराधार व गरजू शेतक-यांना होईल तेवढा नैतीक, आर्थिक आधार संघटीतपणे देवून त्याचे मनोधैर्य वाढवा, एका ठिणगीतूनच वणवा निर्माण होणार आहे. त्यात जळू द्या सर्व दूष्ट प्रवृत्तींना भस्म होवू द्या.

आम्ही पुण्यात श्री. प्रभाकर भोसले (बळीराजा, फोन नं. (०२०) २४४७३२२५), श्री. दिलीपराव देशमुख बारडकर (उपाध्यक्ष, मॉफ, मो. ९८८१४९७०९०), डॉ. गलांडे (शेती तज्ञ, फोन नं. (०२०-२४४८७२३९), श्री. सुधाकर यशवंत दांडेकर (कृषि अभियंता, मो. ९४२२३२२९४२), डॉ. मुकूंदराव गायकवाड ,शेतीतज्ञ, फोन नं. (०२०-२४४७८९३२), श्री. दिवाकर बोकरे, शेतीतज्ञ, फोन नं. (०२०-२५४५७१९०, मो. ९८५०७०७९१७) व इतरांनी मिळून शेतकरी चर्चा मंडळ स्थापन केले आहे. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी आम्ही सर्वजण एकत्र येतो. सर्वांनी त्यात सहभागी होण्याची विनंती आम्ही करतो. गावोगावी स्थापन झालेल्या मंडळाची माहिती बळीराजांना कळवावी व अधिक मार्गदर्शनासाठी आम्हाला संपर्क साधावा. आम्ही हवे ते सहकार्य करण्यास तयार आहोत.

भारतास जगात कृषि क्षेत्रात महासत्ता बनण्याची सुवर्ण संधी आहे. त्यासाठी फक्त **कालबध्द नियोजन, कठोर परिश्रम व प्रबळ इच्छा शक्ती** या तीन बाबींची आवश्यकता आहे. देशाची कृषि विकासाठी दिशा कोणती असावी त्याचा मार्गदर्शक मसुदा " शेतकरी चर्चा मंडळ, पुणे " च्या सदस्यांनी तयार केला आहे. राज्यकार्यांना "बुध्दिमंताची " गरजच नसते हा पूर्वानुभव असल्याने ती शासनास सादर करणे निरर्थक होईल असा विचार झाल्याने तो प्रसिध्द करीत नाही.

वाचकांनी आपल्या अनुकूल प्रतिकूल प्रतिक्रिया जरुर कळवाण्यात आत्मपरिक्षणास त्याचा उपयोग होईल.